आवक नोंद
म. सं. चि. सं. (विद्युतगृहे)
नाशिक
अ. अ.
स. अ.
प्र. लि. :-
आवक क्र. :-
दिनांक :-
टेबल :-

**खाजगीकरणातून विकसित करावयाच्या जलविद्युत प्रकल्पांचे करारनामे स्वाक्षांकित करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
पाटबंधारे विभाग-
शासन परिपत्रक क्रमांक- पीव्हीटो १००४/(४२/२००४)/जलविद्युत
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक- ४.११.२००४

पहावे :- शासन पत्र क्रमांक: जविप्र-१०९८/(८१/९८)/लु.ब.-१/ज.वि. दि.३.१२.१९९९.

**परिपत्रक :**

खाजगीकरणातून विकसित करावयाच्या जलविद्युत प्रकल्पांबाबत अवलंबावयाच्या कार्यपध्दतीत एकसूत्रता राहण्याच्या दृष्टीने पुढील पध्दत अनुसरण्यात यावी.

१. मुख्य अभियंता (विद्युत), यांनी खाजगीकरणातून उभारणी करावयाच्या प्रकल्पांचा प्रस्ताव शासनास सादर करुन त्यास शासनाची मान्यता घ्यावी. असे प्रस्ताव पाठवताना प्रकल्प अहवालाची प्रत सोबत सादर करावी.

२. वृत्तपत्रात व शासनाच्या वेबसाईटवर जाहीर प्रकटन देऊन प्रवर्तकाकडून प्रस्ताव मागविणे तसेच निविदांची छाननी करुन प्रवर्तकाची निवड करणे व प्रवर्तकास हेतूपत्र देणे ही कार्यवाही मुख्य अभियंता (विद्युत) यांनी करावी.

३. अधीक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता (विद्युत) यांनी स्थापत्य अधीक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता यांचेकडून शिर्षकामे/कालवा इत्यादी बाबतची आवश्यक माहिती प्राप्त करुन घेऊन प्रारुप निविदा तयार करावी. सदर प्रारुप निविदा संबंधीत अधीक्षक अभियंता (स्थापत्य) यांना पाठऊन त्यांचे अभिप्राय प्राप्त करुन घ्यावेत. त्यानंतरच मुख्य अभियंता (विद्युत) यांनी प्रारुप निविदेस मान्यता द्यावी.

४: मुख्य अभियंता, (विद्युत) जलविद्युत प्रकल्प, मुंबई यांनी प्रवर्तकास हेतूपत्र देऊन त्यास कराराविषयक पुढील कार्यवाही करण्यासाठी संबंधित स्थापत्य मुख्य अभियंत्यांशी संपर्क साधण्याच्या सूचना द्याव्यात व कराराविषयक सर्व मूळ कागदपत्रे संबंधित स्थापत्य मुख्य अभियंत्यांकडे वर्ग करावीत. त्यानंतर प्रवर्तकाशी करावयाचा करारनामा प्रकल्पाचे संबंधित मुख्य अभियंता (स्थापत्य) यांनी स्वाक्षांकित करावा व सदर करारनामा पुढील कार्यवाहीसाठी जलविद्युत प्रकल्पांशी निगडित धरण ज्या स्थापत्य विभागाच्या अखत्यारित आहेत त्या विभागाकडे पाठविण्यात यावा.

खाजगीकरणातून विकसित करावयाच्या जलविद्युत प्रकल्पाकरिता प्रवर्तकाशी करावयाचा करारनामा पाटबंधारे विभाग, महाराष्ट्र शासन यांचे वतीने स्वाक्षांकित करण्याकरिता मुख्य अभियंता (विद्युत) व पाटबंधारे विभागांतर्गत इतर सर्व मुख्य अभियंते प्राधिकृत आहेत. विधी व न्याय विभागाकडून याकरिता विशेष परवानगी घेऊन दि. ३.१२.१९९९ च्या शासन पत्रान्वये विधी व न्याय विभागाची सदर बाबतची अधिसूचना सर्व मुख्य अभियंता यांना प्रसृत करण्यात आली आहे. (सोबत प्रत जोडली आहे.)

सोबत : वरीलप्रमाणे.

( दि. भा. कुलकर्णी )
शासनाचे उप सचिव

प्रत:- सर्व मुख्य अभियंते, पाटबंधारे विभाग
सर्व अधीक्षक अभियंते, पाटबंधारे विभाग.
सर्व कार्यकारी अभियंते, पाटबंधारे विभाग
जलविद्युत कार्यासन (संग्रहार्थ).

FILENAME \p C:\LETTER\Tilari Arbitration\YEAR2003\MALIK\42. 2004 19.10.2004.doc

अधीक्षक अभियंता,
म. सं. सं. (वि. गृ.)
नाशिक - ४.

उपविभागीय अभियंता (प्रशासन)
अ.अ. (वि.गृ.) यांचे करिता
नाशिक-४.